| CNR No- MHRT090001122020 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०९/०४/२०२० |
| | नोंदणी दिनांक | : | १५/०४/२०२० |
| | निकाल तारीख | : | **२०/०४/२०२६** |
| | कलावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | ०६ ०० ११ |

फॉर्म नं. **XXXII**

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(**i**))

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा, ता.लांजा, जि.रत्नागिरी यांच्या न्यायालयात**

**(एस. आर. जोशी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी लांजा यांचेसमोर)**

**न्यायनिर्णय दिनांक –२०/०४/२०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४८/२०२०**

**निशाण – ३०**

| | |
|---|---|
| | गु.र.क्र. ९९/२०१९ लांजा पोलीस ठाणे, लांजा. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा. |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासनाकरीता तपासिक अंमलदार लांजा पोलीस ठाणे, ता. लांजा, जि.रत्नागिरी.** |
| **फिर्यादी तर्फे प्रतिनिधीत्व** | **श्री. एस. एस. वळवी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.** |
| **आरोपी** | **तुकाराम लक्ष्मण आग्रे,** वय- ८७ वर्षे, व्यवसाय-शेती, रा. कोट आगरगांव आग्रेवाडी, ता. लांजा, जि.रत्नागिरी |
| **आरोपीतर्फे प्रतिनिधीत्व** | **वकील श्री. एन. के. चव्हाण** |

भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(**ii**))

| | |
|---|---|
| **गुन्हयाची तारीख** | २५/०९/२०१९ |
| **फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख** | २५/०९/२०१९ |

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:10:43 +0530

| | |
|---|---|
| **दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख** | ०९/०४/२०२० |
| **आरोपी विरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख** | १७/०७/२०२५ |
| **पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख** | २५/०८/२०२५ |
| **निकालाची आरक्षीत तारीख** | लागू नाही |
| **निकालाची तारीख** | २०/०४/२०२६ |
| **जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख** | लागू नाही |

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामिनावर सोडलेची तारीख** | **दोषारोप ठेवलेले गुन्हे** | **निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली** | **दिलेली शिक्षा** | **फौ.प्र.स.कलम ४२८ संपरिक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **तुकाराम लक्ष्मण आग्रे** | २६/०९/२०१९ | २६/०९/२०१९ | **महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई)** | निर्दोष मुक्त करण्यात आले. | लागू नाही. | लागू नाही. |

## न्यायनिर्णय

प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे चालविण्यात आलेला आहे.

**खटल्याचा सारांश थोडक्यात खालील प्रमाणेः-**

**०२.** दि. २५/०९/२०१९ रोजी १८.४५ वाजताचे सुमारास मौजे कोट आगरगांव आग्रेवाडी येथील आरोपीचे राहते घराचे समोरील अंगणाचे कोपऱ्यात अडगळीचे ठेवलेल्या

सामनाचे बाजूला उघडया ठिकाणी, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथे आरोपीचे ताब्यात गैरकायदा बिगर परवाना एक १५ लिटर मापाची पिवळ्या रंगाची हिरवे फिरकीचे झाकण असलेली प्लॅस्टीकची बरणी त्यात १२ लिटर गावठी हातभट्टीची दारू, एक सफेद मळकट रंगाचा ५ लिटर मापाचा प्लॅस्टीकचा कॅन त्याला फिरकीचे बूच असून त्यात ४ लिटर गावठी हातभट्टीची दारू व एक स्टीलचे दारू वासाचे ग्लास असा मुद्देमाल मिळून आला. त्यानुसार लांजा पोलिस ठाणे येथे गु. र. क्र. ९९/२०१९ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ ई अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली. सदर फिर्यादीनुसार संपूर्ण तपास करुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०३.** निशाण १३ येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ ई प्रमाणे आरोपीचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षेची मागणी केली.

**०४.** अभियोग पक्षाने त्यांचा पुरावा दाखल केला. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अंतर्गत निवेदन (निशाण २९) नोंदविण्यात आले. आरोपीचे निवेदनातील कथनावरुन तसेच आरोपीने अभियोग पक्षाचे साक्षीदार यांचा ज्या बचावाच्या आधारे उलटतपास घेतला त्या बचावावरुन आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली आहे असा आरोपीचा बचाव आहे. आरोपीने आपले बचावाच्या पुष्टयर्थ स्वतःला अगर अन्य साक्षीदारांना तपासलेले नाही.

**०५.** अभिलेखातील सर्व कागदपत्रे वाचली. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता **श्री. एस. एस. वळवी** व आरोपीतर्फे वकील **श्री. एन. के. चव्हाण** यांचा युक्तिवाद ऐकला.

**०६.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता तसेच अभियोग पक्ष व बचाव पक्ष यांचे तर्फे युक्तिवाद ऐकल्यानंतर या न्यायालयापुढे पुढील मुद्दे उपस्थित झाले आहेत. ते मुद्दे व त्या मुद्दयांवरील कारणमिमांसेसह निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:11:18 +0530

| **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|
| १. दिनांक २५/०९/२०१९ रोजी १८.४५ वाजताचे सुमारास मौजे कोट आगरगांव आग्रेवाडी येथील आरोपीचे राहते घराचे समोरील अंगणाचे कोपऱ्यात अडगळीचे ठेवलेल्या सामानाचे बाजूला उघडया ठिकाणी, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथे आरोपीचे ताब्यात गैरकायदा बिगर परवाना एक १५ लिटर मापाची पिवळया रंगाची हिरवे फिरकीचे झाकण असलेली प्लॅस्टीकची बरणी त्यात १२ लिटर गावठी हातभट्टीची दारू, एक सफेद मळकट रंगाचा ५ लिटर मापाचा प्लॅस्टीकचा कॅन त्याला फिरकीचे बूच असून त्यात ४ लिटर गावठी हातभट्टीची दारू व एक स्टीलचे दारू वासाचे ग्लास जूने वापरते असा मुद्देमाल मिळून आला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | ....**नाही**. |
| २. अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ बाबतः-</u>

**०७.** महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने कलम ६५(ई) नुसार आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील नियमांचे उल्लंघन करुन मादक द्रव्य (अफु किंवा भांग व्यतीरीक्त) विक्री केलेले आहे किंवा विकत घेतलेले आहे हे शाबित करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये आरोपीने गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने शाबित केले आहे किंवा कसे, हे तपासण्यासाठी अभियोग पक्षाने या कामी सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन होणे आवश्यक आहे.

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:11:24 +0530

**०८.** प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार विलास लुकाजी कांबळे यांना साक्षीदार क्र. १ म्हणून निशाण १९ येथे तपासले आहे. त्यांनी त्यांचे सरतपासाचे दरम्यान असे कथन केले आहे की, त्यांना पोलिसांनी आरोपीचे घराजवळ बोलविल्यानुसार ते तेथे गेलेत व तेथे पोलिसांना आरोपीकडे दोन प्लॅस्टीकचे कॅनमध्ये दारू मिळून आली. त्यानंतर पोलिसांनी मिळालेला मुद्देमाल ताब्यात घेतला व त्यानंतर पोलिसांनी त्यांची सही घेतली. सदर साक्षीदाराच्या साक्षीद्वारे पंचनामा (निशाण अ-१/अ.सा.१) शाबीत झाला.

**०९.** सदर साक्षीदाराचा आरोपीचे सन्माननीय वकीलांमार्फत उलटतपास घेण्यात आला. त्याने त्याचे उलटतपासाचे दरम्यान तो घटनास्थळी जाण्यापूर्वीच पोलिसांनी पंचनामा लिहिण्यास सुरवात केली होती असल्याचे कथन केलेले आहे. तसेच त्याने त्याने पोलिसांना पंचनाम्यातील मजकूर सांगितला व त्याप्रमाणे पोलिसांनी नोंदविला असे काही घडले नसल्याचे व पोलिसांनी सांगितल्यामुळे पंचनाम्यावर सही केली असल्याचे मान्य केलेले आहे.

**१०.** सदर कामी साक्षीदारांना वारंवार साक्षीसमन्स काढून देखील साक्षीदार हजर झालेले नाही. साक्षीदारांना वारंवार साक्षीसमन्स काढूनही साक्षीदार याकामी हजर झाले नसल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सदरहू खटल्यातील फिर्यादी, तपासिक अंमलदार व इतर पोलिस साक्षीदार याकामी हजर न झाल्याने त्यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही.

**११.** येथे हे नमूद करणे गरजेचे आहे की, महाराष्ट्र दारुबंदी खटल्यामध्ये पंच व तपासणी अहवाल (सी.ए. रिपोर्ट) हे महत्त्वाचे पुरावे असतात. प्रस्तुत खटल्यात तपासणी अहवाल शाबीत झालेला नाही. या खटल्यातील पंच साक्षीदार श्री. विलास (अ.सा.क्र.१) यांचे साक्षीद्वारे पंचनामा (निशाण अ-१/अ.सा.१) शाबीत झाला असला तरी त्यांनी उलटतपासाचे दरम्यान केलेल्या कथनांचा एकंदरीत विचार करता तसेच त्यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही साक्षीदार उपस्थित न झाल्याने अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पंच साक्षीदार श्री. विलास (अ.सा.क्र.१) यांचे कथनांना दुजोरा देणारा अन्य कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे निव्वळ श्री. विलास (अ.सा.क्र.१) यांचे साक्षीच्या आधारावर आरोपीला दोषी ठरविता येवू शकत नाही. तसेच प्रस्तुत खटल्यात मुद्देमाल देखील न्यायालया समक्ष आणला गेलेला नाही.

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:11:31 +0530

**१२.** वरील सर्व चर्चेचे अवलोकन करता मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबतः-**

**१३.** फौजदारी खटल्यांमध्ये अभियोग पक्षाने त्याची हकीकत संशयाच्या पलीकडे (beyond reasonable doubt) शाबीत करणे गरजेचे आहे. परंतु प्रस्तुत खटल्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, अभियोग पक्ष सदर हकीकत संशयाच्या पलीकडे (beyond reasonable doubt) शाबीत करू शकलेला नाही. त्यामुळे, सबळ पुराव्या अभावी आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहेः-

**आ दे श**

**१.** आरोपी **तुकाराम लक्ष्मण आग्रे** यांस महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) चे गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करणेत येत आहे.

**२.** आरोपीचे पूर्वीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** या निर्णयाच्या विरोधात अपीलकामी अथवा अर्जाच्या अनुषंगाने वरीष्ठ न्यायालयात हजर राहण्यासाठी आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) अन्वये त्याचे रक्कम रूपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा सहा महिने कालावधीचे जामिन बंधपत्र द्यावे.

**४.** जप्त मुद्देमालातील १२ लिटर व ४ लिटर गावठी हातभट्टीची दारू नियमांप्रमाणे विल्हा करणे करीता जिल्हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, रत्नागिरी यांचेकडे अपिल कालावधी समाप्तीनंतर पाठविण्यात यावी.

**५.** जप्त मुद्देमालातील एक १५ लिटर मापाची पिवळया रंगाची हिरवे फिरकीचे झाकण असलेली बरणी व एक सफेद मळकट रंगाचा ५ लिटर मापाचा प्लॅस्टीकचा कॅन तसेच एक स्टीलचे दारू वासाचे ग्लास यांची नियमांप्रमाणे विल्हेवाट अपिल कालावधी

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:11:38 +0530

समाप्तीनंतर लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:11:43 +0530

**दिनांक २०/०४/२०२६.** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा,**

**ता. लांजा जि.रत्नागिरी.**

## परिशिष्ट

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii))

**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी साक्षीदारांची यादी**

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाण |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | विलास लुकाजी कांबळे | पंच साक्षीदार | १९ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाण |
|---|---|---|---|
| नाही | | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाण |
|---|---|---|---|
| नाही | | | |

**सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी**

**अ. सरकारी**

| क्रमांक | निशाण | वर्णन |
|---|---|---|
| १ | अ-१/अ.सा.१ | पंचनामा |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाण | वर्णन |
|---|---|---|

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:11:55 +0530

| |
|---|
| **नाही** |

**क. न्यायालयीन निशाण**

| **क्रमांक** | **निशाण** | **वर्णन** |
|---|---|---|
| | **नाही** | |

**मुद्देमाल**

| **क्रमांक** | **मुद्देमाल वस्तू क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | -- | एक १५ लिटर मापाची पिवळ्या रंगाची हिरवे फिरकीचे झाकण असलेली प्लॅस्टीकची बरणी त्यात १२ लिटर गावठी हातभट्टीची दारू |
| २ | -- | एक सफेद मळकट रंगाचा ५ लिटर मापाचा प्लॅस्टीकचा कॅन त्याला फिरकीचे बूच असून त्यात ४ लिटर गावठी हातभट्टीची दारू |
| ३ | -- | एक स्टीलचे दारू वासाचे ग्लास |

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.20 18:12:02 +0530

**दिनांक २०/०४/२०२६.** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा,**

**ता. लांजा जि.रत्नागिरी.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 20/04/2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 20/04/2026 |
| Order uploaded on | :- | 20/04/2026 |